PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Saadhi Manas
Year: 1965

Song: Airanichya Deva Tula
Lyricist: Jagdish Khebudkar

ऐरणीच्या देवा तुला
ठिणगी ठिणगी वाहू दे
आभाळागत माया तुझी
आम्हांवरी राहू दे
आभाळागत माया तुझी
आम्हांवरी राहू दे
ऐरणीच्या देवा तुला
ठिणगी ठिणगी वाहू दे
आभाळागत माया तुझी
आम्हांवरी राहू  दे
आभाळागत माया तुझी
आम्हांवरी राहू दे

लेवू लेणं गरीबीचं
चणं खाऊ लोखंडाचं
लेवू लेणं गरीबीचं
चणं खाऊ लोखंडाचं
जीणं होऊ आबरूचं
धनी मातुर माझा देवा
वाघावानी असू दे
आभाळागत माया तुझी
आम्हांवरी राहू दे

लक्ष्मीच्या हातातली
चवरी व्हावी वर खाली
लक्ष्मीच्या हातातली
चवरी व्हावीवर खाली
इडा पिडा जाईल
आली किरपा तुझी
भात्यातल्या सूरा संग
किरपा तुझी भात्यातल्या सूरा संग
गाऊ दे
आभाळागत माया तुझी
आम्हांवरी राहू दे

सुख थोडं दुःख भारी
दुनियाही भली बुरी
सुख थोडं दुःख भारी
दुनियाही भली बुरी
घाव बसंल घावावरी
सोसायाला झुंजायाला
अंगी बळ येऊ दे
आभाळागत माया तुझी
आम्हांवरी राहू दे
ऐरणीच्या देवा तुला
ठिणगी ठिणगी वाहू दे
आभाळागत माया तुझी
आम्हांवरी राहू दे

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*